Vol 6 Issue 12 Jan 2017
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY - 2017

# वाग्येयकार कै.पं. जगन्नाथ बुवा पुरोहित

डॉ. स्नेहाशिष दास[1] , श्री. मोहन देवरावजी पोकळे [2]
[1]संगीत विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, अमरावती .
[2]एम. ए. नेट, (संगीत)




सारांश :

प्राचिन काळामध्ये जी व्यक्ती पद रचना व स्वर रचना या दोन्हीमध्ये प्रविण असे त्याला वाग्येयकार म्हटले जात होते. वाक अर्थात पद्य व गेय अर्थात संगीत; या दोन्हीमध्ये ज्ञात असणारा वाग्येयकार म्हटल्या जायचा; यालाच काही विद्वान मातु आणि धातू  म्हणतात. संगीत रत्नाकर मध्ये वाग्येयकाराचे 28 गुणविशेष सांगितलेले आहेत. संगीत व साहित्य क्षेत्राच्या ज्ञानासोबतच विभिन्न प्रदेषांची प्रथा–परंपरा, भाषा, काकू पध्दतीचे ज्ञान तसेच शीघ्र रचना करण्याची शक्ती, मनाची एकाग्रता, तिन्ही स्थानांमध्ये गमक घेण्याची शक्ती ,राग–व्देशाचा अभाव, अलौकिक बुद्धीमत्ता, वाक्चातुर्य, दुस–यांच्या मनातील भाव जाणून घेण्याची कुशलता, आयुष्यभर काही तरी शिकण्याची धडपड व शिष्यांच्या कल्याणाकरिता त्यांना काहीतरी नवीन देण्याची तळमळ इत्यादी गुण वाग्येयकाराच्या ठायी असणे आवश्यक आहेत.

वरील गुणांचे अवलोकन केले असता कै. पं. जगन्नाथ बुवा पुरोहित(गुणीदास) हे वाग्येयकार या संज्ञेस परिपूर्णतः खरे उतरतात. त्यांनी आयुष्यभर ज्ञान–कण वेचण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता अनेक उस्तादांची मनोभावे सेवाकेली. त्यांनी आपल्या आयुष्याच्या षेवटपर्यंतच ज्ञानदानाचा संगीत यज्ञ कायम पेटता ठेवला. त्यांनी वाद्यवादन (तबला) मध्ये सुध्दा नैपूण्य मिळवून शिष्य तयार केलेत. गायनात तर त्यांनी खुप मोठा लौकीक मिळवून असंख्य शिष्य निर्माण केलेत. त्यांनी शेकडो बंदीशी निर्माण तर केल्याच सोबतच नवीन राग निर्माणकरून संगीताच्या दालनाला कळसच लावून दिला.

पं. जगन्नाथबुवा पुरोहित गुणीदास यांचा जन्म दक्षिण हैद्राबादेतील एका गरीब भिक्षूक कुटुंबात झाला. आई–वडीलांच्या मायेला ते त्यांच्या किशोरावस्थेतच पारखे झाले. एकंदरीत त्यांचे बालपण अतिशय हालाखीच्या परिस्थितीमध्ये गेले. त्यामुळे शालेय शिक्षणा पासून ते वंचीतच राहीले. सही करण्यापुरत माझ शिक्षणं झालं असे ते म्हणत. परंतु अशा या अतिशय गरिबीत जन्मलेल्या, लहानपणीच आई–वडिलांचे छत्र हरविलेल्या अनाथ बालकानेआपल्या जीवनात अलौकीक बुद्धिमत्तेने, आपल्या अपार कष्टाने, सेवाभावाने जेस्थान मिळविले, जो अपार शिष्यवर्ग व स्नेहीजन मिळविले ते कदाचीतच कुणाला मिळाले असतील. बुवांनी संगीतामध्ये केवळ ज्ञानच प्राप्त केले नाही तर तेसंगीताचे महर्षी बनले. गायन, वादन, नव–रचना, नव–राग निर्मीती, ज्ञानदानइत्यादी क्षेत्रात अलौकीक कार्य करुण वाग्येयकार म्हणून स्थापित झालेत.

## बुवांचे संगीत शिक्षण :

जगन्नाथ बुवांच्या गळयात परमेश्वराने सूर घातला. वाड–वडीलांचा व्यवसाय भिक्षुकीचा असला तरी, 'इदं न मम ' म्हणत जगन्नाथ बुवा मा्त्र कथा किर्तनातील भजनात रंगू लागले, आणि त्याकाळी हैद्राबादेत निजामाच्या दरबारात होणा–या मैफिलीत ते शरीक होऊ लागले. जगन्नाथ बुवा अतिशय गरीब कुटुंबात जन्मले असल्यामुळे त्यांच्याकडे विद्या प्राप्त करण्याकरिता, गुरुंना फी म्हणून देण्याकरिता काहीही नव्हते; परंतु एक गुण त्यांच्याकडे भरभरुण होता, आणि तो म्हणजे सेवा निष्ठा; आणि  या गुणाच्याच भरवश्यावरच त्यांनी संगीत कलेचा खजीना प्राप्त केला.

त्यांना पहीले संगीतगुरु म्हणून लाभले 'महम्मद अलीखॉ. तो काळ फार वेगळा होता. कुणालाही सहज व़िद्यादान केले जात नव्हते. सत्पात्री दान देण्याची प्रथा होती. गुरु शिष्यांची परिक्षा घेवून निरखून –पारखून विद्यादान करत होते. शिष्याला विद्या देतांना आपण संगीत कला वाढीस लावतोय असा समज होता. आपल्या जवळचा अनमोल ठेवा आपल्या शिष्यांजवळ मोठया प्रमाणे ठेवून गुरुजन जात आणि शिष्यांनीही कुळाचार पुढे पाळावा असे अपेक्षित असे. पुढे बुवांनी महम्मद अली खॉसाहेबांसोबतच शब्बुखॉ साहेबांकडेही संगीत शिक्षणास आरंभ केला. त्यानंतर कोल्हापुरात आल्यावर तेथे पंजाबचे धृपदिये गायक गुलाम अहमद तलवंडी वाले यांचे पाशी संगीत शिक्षण घेऊ लागले आणि 1930 साली बुवांच्या जीवनात गुरुपुष्य योग चालून आला. त्यांना आग्रा घराण्याचे ज्येष्ठ गायक म. विलायत हुसेन खॉसाहेबांचे शिष्यत्व  प्राप्त झाले व खॉसाहेबांच्या मृत्युसमयी पर्यंत ते त्यांचे शिष्य बनून राहिले. या योगाने बुवांच्या जीवनाचे सोने झाले. बुवांचे नाव सर्वपरिचित झाले. खॉसाहेबांच्या रुपाने एक आदर्श गुरु बुवांना प्राप्त झाला. त्यांचे संबंध

पिता–पुत्रा सारखे होते. एक आदर्श गुरु आणि एक आदर्श शिष्य म्हणून विलायत हुसेन खॉसाहेब आणि जगन्नाथबुवा हयांचे सारी गाण्याची दुनिया नांव घेते. त्यांनी प्रत्येकाकडून काहीना –काही प्राप्त करुन घेतले. ज्ञान प्राप्ती मध्ये त्यांचा दृष्टीकोन अतिशय व्यापक होता. अगदी आशा,लतांची गीते एकूण त्यांतील एखादी आवडीची लकेर घेण्याचा ते प्रयत्न करत. त्यांची गुरुपरंपरा फार मोठी आहे. त्यांत सिकंदरा घराण्यातले महंमद अली, तानरसखॉंचे पुत्र उमराव खॉसाहेब, सरदारखॉं, शब्बुखॉं, तलवंडी घराण्याचे महंमदखॉं, आणि अखेर आग्रवाले विलायत हुसेन खॉं साहेब. कोणाजवळ त्यांनी 'स्वर साधना'केली, कोणाजवळ 'आलापी' शिकली, कोणाची 'बोल–उपज'घेतली, कोणाकडून 'आडीदिंडी 'चे चलन आत्मसात केले. बुवांनी हे सर्व धन आपल्या सेवाभावाने प्राप्त केले. तबला वादनामध्ये बुवांनी फार प्राविण्य मिळविले. तबल्याचा अभ्यास बुवांनी खॉसाहेब थिरकवा सारख्या नामवंत उस्तादाजवळ तसेच मिरजेचे उस्ताद मेहबुबखॉं साहेबांजवळ केला. थिरकवा साहेब सुध्दा बुवांवर अतिशय प्रेम करित, त्यांना बेटा अशी हाक मारीत.

### *बुवांची शिष्यपरंपरा :–*

बुवांनी विलायत हुसेन खॉसाहेब यांचे ऋण जितक्या अंशी गायक होऊन फेडले, त्याही पेक्षा जास्त त्यांच्या सारखा उत्तम शिक्षक होऊन फेडल आहे. हे दैवत वरुन फार कडक पण आतून तेवढचं मऊ, त्यांनी कधी शिष्याच्या मनाचा विचार केला नाही, पण त्याच्या गळयावर गाण्याचे संस्कार करण्याकरिता जो आटा–पिटा केला तो पाहण्यासारखा होता. त्या काळचे सर्व प्रसिध्द गायक त्यांचे शिष्य होते. त्यामध्ये पं. जितेंद्र अभिषेकी, राम मराठे, माणिक वर्मा, सुशिला नंजुद्रदीया, मदन–बोगाळे, जी. एन. जोशी, बाळकराम, सुरेश हळदणकर,कुमार गंधर्व इत्यादी परंतु या सर्वांचे वैशिष्टय बुवांनी जपले, कुणाच्याही गळयातून आपणच पुढे येण्याचा अटटहास त्यांनी कधी केला नाही. प्रत्येकाच्या स्वतंत्र प्रतिभेप्रमाणे त्याचा विकास होऊ दिला व आपणा मार्गदर्शन केले. या सर्वांच्या गायकी मध्ये बुवांचा सुक्ष्म सुवास दरवळत राहतो. बुवांनी तबल्यामध्येही बरेच शिष्य तयार केलेले होते. त्यामध्ये भाई गायतोंडे यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. गुणीदास बुवांनी विद्या संपादन करतांना जसे अपार कष्ट घेतले तसेच विद्यादान करतांनाही पराकोटीचं औदार्य दाखविल. ' फोडिले भांडार ' हया वृत्तीने विद्येचे दान करणारी माणसं ही संगीत कलेची चालती बोलती विद्यापिठ असतात. त्यांचा अट्टहास होता तो, 'मुष्कील करो आसानं, ' हे साधण्याचा ! शिष्याच्या गळयावर चीज चपलखपणे चढावी हीच त्यांची तळमळ असायची.

### *बुवांच्या गायकीची वैशिष्टये :*

बुवांनी वयाच्या अगदी दहाव्या–अकराव्या वर्षापासून मोठ–मोठया संगीत उस्तादांपासून संगीत शिक्षण प्राप्त केले. परंतु त्यांचे दीर्घकाळ पर्यंत चे संगीत शिक्षण आग्रा घराण्याचे उस्ताद म. विलायत हुसैनखॉं साहेबांकडे झाले. आग्रा घराण्याची मूळ परंपरा ही ध्रुपद घमाराची होती, त्यामध्ये नौहरवाणी प्रमुख होती. घग्घे खुदाबक्शांपासून या घराण्यामध्ये ख्याल गायकीचा प्रवेश झाला. गायकीत स्वरांचा लगाव नोम–तोम मध्ये अकार–आकार इकार–उकार–नकार मकार सहीत धृपद–धमार किंवा ख्यालाच्या चिजांच्या बोलांसहीत खुला आणि स्पष्ट राहतो.

जगन्नाथबुवांच्या राग मांडणीत खूप सौंदर्य दृष्टि दिसून येई. त्यांचा स्वरोच्चार व शब्दोच्चाराचा ढंग खास उस्ताद शैलीचा होता. विशेषतःत्यांची बोल–उपजाची पध्दत, लयकारित बोल खेळविण्याची शैली, भावानुकुल शब्द उच्चारण्याची पध्दत फार आकर्षक होती. नुसता अस्ताई अंतरा मांडून रागाचे डौलदार रुप प्रगट करण्याचा विचार आग्रा घराण्याच्या गायकांनी केला. शास्त्रीय संगीतामध्ये शब्दांना गौण महत्व हे साहित्यीक दृष्टया, निराकार रागाला साकार रुप प्राप्त करुन देणा–या व्यंजनांनी बनलेले शब्द हे चिजेला मिळालेला भक्कम आधारच असतो. या घराण्याने बंदिशीला अग्रस्थान दिले.

बुवांनीही विलायतखॉं कडून हे मर्म जाणून घेतलं. सूर आणि लय हे संगीत संसाराचे दोन आवश्यक घटक, याचा खोलवर जावून विचार केला. विलायत हुसैनखॉं आपल्या गायनात लयीला अतिशय मनोहर हेलकावे देत असत. विलायतखॉं. च्या सहवासात बुवांनी लयीचा हा स्वभाव उत्तम रितिने जाणला व ते स्वतः उत्तम तबलिये असल्यामुळे कुठल्याही मात्रेला बळसा दिल्याने गायनास अपाय होणार नाही हे पथ्य त्यांनी कसोशीने पाळले. आलाप करतांना,लयीची जाण ठेवून केला तर त्यात एक वेगळीच गंमत आहे. आलाप करतांना काय किंवा लयकारी करतांना काय समेला येतांना कस तरी लळत–लोंबत आलेल त्यांना बिलकुल चालत नसे. गाण्यामध्ये भावानात्मकता होती. त्यांच्या गाण्यात शीस्त होती पण कोरडेपणा, रुक्षपणा नव्हता. समेवर येतांना अतिशय डौलदार पणे ते येत. लयकारीवर त्यांचे विषेष प्रेम होते.

ख्यालातील बोलांची फेक, स्वरांचे लगाव, सहजसुंदर लयकारी बुवांच्या गाण्याची खास वैषिष्टये. बुवा नेहमी पांढरी चार मध्ये गात व त्यांचा आवाज तारसप्तकातही सहजपणे जात असे. गायक म्हणुन 1940 ते 1950 दषक त्यांच्या आयुष्यात खूप गाजले, बुवा प्रथम तबला शिकल्याने लयीच अंग त्यांच्या गाण्यात प्रामुख्याने असे. तबल्यात प्रथम जसा पेशकार घेतात नंतर कायदा, नंतर गती व नंतर त्याचा रेला करतात, तसे आपले आलाप झाले पाहीजे असा त्यांचा आग्रह असे. बुवांची लयीच्या अंगान षब्दांची फेक करण्याची जी अगदी निराळी व खास पध्दत होती ती त्यांनी तलवंडीवाले गुलाम महंमद यांच्या कडून घेतली असावी.

### *बंदिश रचनाकार बुवा :*

वाग्येयकार म्हणून बुवांची ख्याती फार मोठी आहे. बुवांनी जवळपास दिडशेहुन अधिक बंदिशींची रचना केली आहे. इंद्रधनुष्यातील सप्तरंगाप्रमाणे मनोहर कलाकृती म्हणजे हया रचना आहेत. बुवा म्हणत की, कधी बंदिशी घडतात तर काही वेळा घडविल्या जातात. ज्या उत्स्फुर्तपणे घडतात त्या अमरत्व प्राप्त करतात. एकेका चिजेची जन्मघडीच विलक्षण असते. तबल्याचे बुवांना उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांनी बांधलेल्या चिजा परंपरेच्या साच्यात बसणा–या असूनही वेगळया धाटणीच्या वाटतात. आपली बांधलेली प्रत्येक चीज खॉसाहेब विलायत हुसैनखॉं ना दाखवून तिची शास्त्रीय दृष्टया चिकित्सा करुन मगच ती त्यांनी प्रचारात आणलेली आहे. आपल्या सर्व चीजा त्यांनी आपल्या गुरु चरणावर वाहिलेल्या आहेत.

रचना करतांना जगन्नाथबुवांनी एक महत्वाचा कटाक्ष पाळला, प्रचारात नसलेले मिश्रराग तरी बनवायचे किंवा प्रचलित रागांपैकी एखादया रागात 'द्रुत' एकतालातली चिज नसेल तर ती बांधायची. 1942 मध्ये त्यांनी पहिली चीज बांधली ती मारुबिहाग रागात. 'द्रुत एकतालातली' चीज नव्हती ती असावी म्हणून. 'गाऊ गुनन कैसे तुमरो' अशा प्रारंभाची चिज होती. त्यानंतर त्यांनी अनेक रागात चिजा बांधल्या, बुवांची जौन भैरव रागातील बंदिश व मारवा रागातील बंदिश येथे देत आहे.

राग जौन भैरव
स्थायी
हो लाडली री मोरी करो ना दुखवा
जुग जुग जीये तू निस दिन पावे सुखवा
अंतरा

तेरी गुणिदास करत बिनति प्रभुसे आज
तेरे घरमें आनंद होवे अब मंगलवा
राग मारवा
स्थायी
हो गुनियन मिल गावो बजाओ
सप्तसुरन के भेद सब मिल बखाने
अंतरा
गुनिजन सब होत नाही, गुनकी चरचा नाही
सेवा गुनीय की की जे, गुनिदास साची साची

बुवांची जोगकंस मधील 'सुधर वर पायो,' 'पिर पराई' आणि स्वानंदी मधील 'जियरा मानत नाही 'या दोन रचनांनी बुवांना यशाच्या शिखरावर नेऊन ठेवले. बुवांनी जोगकंस मधील एकच रचना केली असती तरी त्यांची श्रेष्ठ रचना कारात गणना झाली असती. त्यांच्या अनेक रचना आजही बैठकीत गायल्या जातात. मुलतानीतील 'मानत नाही जियरा' ललत मधील 'जा जा रे बालम' शूद्ध कल्याण मधील 'सांज भयी ', बिहागडया मधील 'मंदिरवा मे आज, अहिर भैरव मधिल 'बेग बेग आवो मंदर' इत्यादी त्यांच्या प्रसिध्द रचना आहेत.

काही जाणकारांच्या मते बुवांच्या रचनेत दोन उणिवा दिसतात.

1) आषयाची विविधता नाही. खॉसाहेब विलायत हुसैनखॉं यांच्या सहवासातला आनंद, विरहातील दुःख असेच भावतरंग एकेका रचनेचा आकार घेतात.

2') स्वरसौंदर्याने नटलेल्या पण फारसा साहित्य दर्जा नसलेल्या हया बंदिषी षब्द वारंवार तेच येतात. अर्थाच सौंदर्य, शब्द सौष्टत्व, कल्पनेची भरारी त्यांच्या चिजात कमी आढळते.

परंतु हया मर्यादाच बुवांच सामर्थ्य आहे. श्री वामनराव जोषी यांनी सुध्दा बुवांच्या रचनेला मार्मिक असे प्रमाणपत्र दिले. ''अभंगरुपाने साधुसंतांनी केलेली भगवंताची भक्ती व बुवांची विलायत हुसैन खॉं साहेबांची भक्ती यात फरक जाणवत नाही. संगीत विद्येतला हा अजब रोमांस आहे. हयांत प्रियकर प्राणप्रिया तर प्रेससी गुनिदास जगन्नाथ हया गुरु–षिष्य संवादाला अंत नाही.

त्यांनी बांधलेल्या व मिळविलेल्या बंदिशी चे पुस्तक 'स्वानंदिनी' नावाने त्यांच्या हयातीत म्हणजे 1964 लाच प्रकाषीत झाले होते, आणि नुकतेच 12 मार्च 2005 रोजी 'स्वानंदिनी भाग–2' या नावाने बुवांच्याच बंदिशी आणि सि.डी. कॅसेटस चे प्रकाशन झालेले आहे.

जगन्नाथ बुवांनी केवळ प्रचलित रागात बंदिशीच निर्माण केल्या नाहीत, तर नव–नविन मिश्र राग ही बनविले. त्यांनी निर्माण केलेल्या रागांमध्ये ' जोगकंस ' हा अतिषय प्रसिध्द राग आहे. (कौशी हे पूर्वीचे नाव बदलून बुवांनी त्या रागास जोगकंस हे नाव दिले व हयाच नावाने आता तो राग प्रचलित आहे. ) त्याच प्रमाणे 'मनरंजनी ', 'जौनभैरव ', ' मधुबसंत ', ' स्वानंदी ' अशा अनेक रागांची त्यांनी रचना केली. त्यांनी रचलेला जोगकंस राग अनेक गायक वादक कलावंताच्या मैफिली सजवित आहे. या एकाच रागाच्या रचनेतून आपल्या 'नायक ' रुपाची प्रचिती संपूर्ण संगीत विश्वाला करवून दिली. एक प्रतिभासंपन्न वाग्येयकार म्हणून बुवा सर्वपरिचीत होते.

## *निष्कर्ष :*

जगन्नाथबुवा एक फार मोठ संगीत साधक होते, उत्तम शिक्षक, एक प्रगल्भ वाग्येयकार, मन मिळावू रसिक, जीवनातील प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेणारे उमद्या व्यक्तिमत्वाचे धनी होते. जो पर्यंत पृथ्वीलतावर अभिजात भारतीय संगीत राहील तो पर्यंत बुवाचे नाव अमर राहील. त्यांनी रचलेले नवीन राग, बांधलेल्या बंदिशी श्रोत्यांचे रंजन करत राहतील. विशेषतः त्यांनी रचलेला जोगकंस तर नेहमीच त्यांची आठवण ताजी करीत राहीत.

## *संदर्भसुची.:*

1) पं. वसंतराव कुलकर्णी पं. जगन्नाथबुवाःएक स्वभाव दर्शन ''अनोळखी नातेवाईक'' सं क.वि. नोव्हेंबर 1994 अंक 11 पृष्ठ क्रं. 90
2) पु. ल. देशपांडे 'गुणीदास जगन्नाथ ' सं. क. वि. नोव्हेंबर 1994 अंक 11 पृष्ठ क्र.6
3) जयति मैत्रा 'उस्ताद विलाय हुसैन खॉं : व्यक्तित्व एवं कृतित्व कनिष्का पब्लिकेशन्स डिस्ट्रीब्यूटर्स 4697 / 5 – 21 ए अंसारी रोड दरियागंज, प्रथम अध्याय आगरा घराणा पृष्ठ क्रं. 14–15
4) वा.वा. गोखले, संगीतातील माणिकमोती, रोहण प्रकाशन, प्रकाशन क्र. 135, पहिला मजला, आनंदी श्रीपाद, 396 ब नारायणपेठ पत्र्या मारोती चौक पुणे, व्दितीयावृत्ती 8 जाने 2003
5) पं. जगन्नाथबुवा पुराहित विशेषांक, संगीत कला विहार अ.भा. गांधर्व महाविद्यालय मंडल प्रकाशन नोव्हेंबर 1994 अंक 11 वर्ष 47

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org